


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १७८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०८ फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### कानवे ग्रुप ग्रामपंचायत सरपंचावर जीवघेणा हल्ला

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** शासनाच्या आदेशानुसार शिक्षकांना मुख्यालयी राहण्याचे आदेश आल्यामुळे अशा शिक्षकांना दाखले दिल्यामुळे शहापूर तालुक्यातील कानवे ग्रुप ग्राम पंचायेतीच्या आदिवासी सरपंचावर जीवघेणा हल्ला करण्याची घटना समोर आली. या घटनेत सरपंचाची पत्नी देखील जखमी झाली आहे.

यावेळी जातीवाचक शिवीगाळ करून प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी चेरवली येथील आठ जनाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यावेळी किन्हवली पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन जणांना अटक केली असून बाकी पाच जण फरार असल्याचे समजते. या प्रसंगी सरपंचाच्या डोक्यावर लाकडी दांडक्याने मारलं असून त्याच्या पत्नीलाही ठोसा बुक्याने मारली व जमिनीवर ढकलून दिली असून तिला मुका मार लागला आहे.

यापूर्वी सरपंच व नामदेव पडवळ यांमध्ये किन्हवली येथे बँकेसमोर बाचाबाची झाली होती. त्यानंतर सरपंच आपल्या परिवारासोबत ६.३० वाजता घरात बसले असता नामदेव पडवळ, सुरेश पडवळ, संकेत पडवळ, भास्कर पडवळ, कैलास पडवळ, बारकु पडवळ, महेंद्र पडवळ व एक महिला अशा ८ जणांनी हातात काठ्या काठ्या घेऊन शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार निदर्शनास आली. दरम्यान किन्हवली पोलिस स्टेशनमध्ये मारहाण व अत्याचार प्रतिबंधक कायद्यायांतर्गत गुन्हा दाखल करून तीन जणांना अटक केली असून बाकीचे पांच जनाचा शोध कार्य सुरू आहे.

### बस आणि कंटेनरची धडक सात गंभीर जखमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्गावर खाजगी बस आणि कंटेनर यांच्यात झालेल्या अपघातात सात जण गंभीर जखमी झाले आहेत . हा अपघात शुक्रवारी (दि. ०७) पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबत आळेफाटा पोलिसांनी कडुन मिळालेल्या माहितीनुसार , पुणे -नाशिक महामार्गावर असलेल्या आळेफाटा गावच्या हद्दीत ट्रक पुणे दिशेने जाणारा ट्रक (जी. के.२७ टी.एफ.१०६३) जात असताना पुणे कडे जाणारया खाजगी बस ट्रॅव्हल्स (एम.एच.१८ बीजी २५००) या बसच्या चालकाला पुढे असलेल्या गतीरोधकाचा अंदाज न आल्याने पाठीमागून बस कंटेनर वर जाऊन जोरात आदळली. या अपघातात बस मधील १) सबाब पिंजारी वय ३५ वर्षे रा. चोपडा जळगाव, २) कल्पना अशोक अहिरराव वय ५८ वर्षे ३) योगेश अशोक अहिराव वय ३५ ४) अशोक तुकाराम अहीरराव वय ६६ सर्व रा. राजगुरूनर, खेड ५) हर्षा प्रशांत माळी वय २५वर्षे रा. भोसरी ६) सोनल पिराचंद शाहा वय ३४ रा.भोसरी ७) राजेश्वरी सुरेंद्र पाटिल वय २४ रा. चिंचवडी हे जखमी झाले आहेत . त्यांना आळेफाटा येथील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# लाडकी बहीण योजनेतून ५ लाख लाभार्थ्यांना वगळले !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी लाभदायक ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या बदललेल्या निकषांची माहिती एक्सवर दिली आहे. या नव्या निकषांनुसार या योजनेतून पाच लाख महिला आता अपात्र ठरणार आहेत. जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेतील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये थेट खात्यात दिले जात होते. आतापर्यंत योजनेचे सात हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लवकरच देण्यात येणार आहे.




**या महिलांना योजनेचा लाभ मिळणार नाही**

आदिती तटकरे यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या निकषांप्रमाणे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २,३०,००० महिलांना वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १,१०,००० महिलांना योजनेतून अपात्र ठरविले गेले आहे. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या आणि स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १,६०,००० महिला आहेत. यानुसार एकूण पाच लाख महिला आता अपात्र ठरल्या आहेत. विधानसभा निवडणुकांआधी जाहीर केलेल्या अनेक योजनांचा मोठा आर्थिक ताण शासकीय तिजोरीवर येत असल्याची ओरड होत होती. यासाठी इतर योजनांचा निधी कमी केला असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या दोन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती.

# खळबळजनक! झोपलेल्या पत्नीला दिला विजेचा 'शॉक'

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, गडचिरोली :** दारुच्या आहारी गेलेल्या पतीने विद्युत खांबावर आकडा टाकून घरात झोपलेल्या होमगार्ड पत्नीला विद्युत शॉक देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने पत्नी वाचली. चामोर्शी तालुक्याच्या नागपूर (चक) या गावात ५ फेब्रुवारीला हा थरार घडला. याप्रकरणी चामोर्शी ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंद झाला असून पती फरार आहे. आशा माणिक सोयाम (४०) असे त्या होमगार्ड महिलेचे नाव आहे. त्या माहेरी नागपूर (चक) येथे वास्तव्यास आहेत.

पती संतोष मारोती शेडमाके (४५,रा. धानापूर ता. गोंडपिपरी जि.चंद्रपूर) हा मजुरी काम करतो. गेल्या काही दिवसांपासून तो दारुच्या आहारी गेलेला आहे. यातून तो आशा सोयाम यांच्याशी सतत वाद घालायचा. दरम्यान, ५ फेब्रुवारी रोजी त्या घरी झोपलेल्या होत्या. पहाटे दोन वाजता संतोष शेडमाके हा घराच्या छतावर चढला. त्याने विद्युत खांबावरुन आकडा टाकून वीज घेतली व लाकडी काडीच्या सहाय्याने कवेलू बाजूला सारुन आशा यांना शॉक दिला. त्यांना जाग आल्यावर त्यांनी पाहिले असता कवेलून संतोष डोकावल्याचे दिसले. यानंतर त्यांनी आरडाओरड केली असता त्याने धूम ठोकली. आरोपी पती संतोष हा सतत दारूच्या नशेत असतो. यातूनच दोघात खटके उडायचे. यापूर्वीही त्याने अशाचा जीव घेण्याचा प्रयत्न केला होता.




याबाबत आशा सोयाम यांनी फिर्याद दिली. त्यावरुन चामोर्शी ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) १०९, ३५१ (२) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपी फरार असून तपास उपनिरीक्षक सुमेध बनसोडे करत आहेत.

**यापूर्वीही केला प्रयत्न !**

२९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष शेडमाके याने घराच्या समोरील चाफ्याच्या झाडाला डिझेल टाकून आग लावली, यावेळी आशा सोयाम यांनी आरडाओरड केल्यावर तो पळून गेला. याबाबत त्यांनी तेव्हाच पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. आशा सोयाम यांच्या पतीचे २००५ मध्ये निधन झाले, तर संतोष शेडमाके याने पत्नीशी फारकत घेतली. २०१५ पासून या दोघांनी पुनर्विवाह केला व एकत्रित राहू लागले. मात्र, नंतर संतोषला व्यसन जडले व त्यातून दोघांत खटके उडू लागले.

## शाळेच्या पाचव्या माळ्यावरून उडी मारून विद्यार्थ्याची आत्महत्या

**दि.०७, नवी मुंबई :** नवी मुंबईतील सी वुड्स येथील एका इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थाने पाचव्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. घटना कळताच एनआरआय पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्या विद्यार्थांचा मृतदेह ताब्यात घेत वैद्यकीय तपासणी साठी पाठवला आहे. आत्महत्याचे कारण मात्र स्पष्ट झाले नाही. सी वुड्स येथील एक इंग्रजी माध्यमाची शाळा नेहमी प्रमाणे सकाळी सात वाजता भरली. सर्व विद्यार्थी आपापल्या वर्गात जात होते. तेवढ्यात नववीत शिकणारा एका विद्यार्थ्याने पाचव्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली.

# पुढील १० वर्षात ठाणे बनणार देशातील आदर्श शहर - परिवहन मंत्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, ठाणे :** ठाणे शहरात आणि जिल्ह्यात अनेक विकास कामे प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर पुढील दहा वर्षात ठाणे शहर केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील आदर्श शहर बनणार यात शंकाच नाही, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज येथे व्यक्त केला.

क्रेडाई एमसीएचआय ठाणे आयोजित २२ व्या रिअल इस्टेट आणि हौसिंग फायनान्स एक्स्पो चे उद्घाटन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीए चे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुद्गल, क्रेडाई चे अध्यक्ष जितेंद्र मेहता, डॉमनिक रोमेल, अजय आशर , स्टेट बँक ऑफ इंडिया चे उप महाव्यवस्थापक सुरजित त्रिपाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी संजय भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

परिवहन मंत्री पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याच्या विकासात्मक प्रकल्पांसाठी सर्वात जास्त निधी उपलब्ध करून दिला आहे. ठाणे शहराचा आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच एकमेव ध्येय आहे. वाहतूक कोंडीचे वास्तव नाकारता येणार नाही मात्र त्याबाबतीत लवकरच उपाययोजना करण्यात येणार आहेत.



ते पुढे म्हणाले, गायमुख ते दहिसर मेट्रो, गायमुख घाट रस्त्याचे काँक्रीटीकरण,घोडबंदर परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे, नागला बंदर खाडी किनारा विकास प्रकल्प, मँग्रोव्ह पार्क अशी विविध कामे सुरु आहेत किंवा होणार आहेत. पुढील दहा वर्षात ठाणे शहर केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील एक विकसित आदर्श शहर बनणार यात शंकाच नाही.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रेडाई चे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी केले. तसेच याप्रसंगी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी मनोगत व्यक्त करताना ठाणे जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाचे योगदान याविषयी उपस्थितांना माहिती दिली. तर ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली. त्याचबरोबर ठाणे शहरातील विकासात क्रेडाई एमसीएचआय ची भूमिका श्री.अजय आशर यांनी विस्तृतपणे मांडली.

# लाडक्या बहिणींसाठी उद्धव ठाकरेंनी उठवला आवाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** सहा महिन्यांपूर्वी राज्य सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेद्वारे राज्यातील लाखो महिलांना मासिक आर्थिक लाभ देण्यात येत आहे. अशात आता सरकारने या योजनेचे निकष बदण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे या योजनेसाठी पाच लाख महिला अपात्र ठरणार आहेत.

यानंतर सरकारच्या या निर्णयावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी टीका केली आहे. आज 'शिवबंधन' कार्यअहवाल प्रकाशन सोहळ्यात त्यांनी, जर अपात्र ठरणाऱ्या पाच लाख महिलांना दिलेले पैसे परत घेणार असाल तर त्यांनी दिलेली मतेही तुम्हाला मिळालेल्या मतांतून वगळणार आहात का?, असा प्रश्न सत्ताधाऱ्यांना विचारला आहे.

**जर त्यांना दिलेले पैसे परत घेणार असाल तर...**

या कार्यक्रमात बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, आताच येताना मी एक बातमी वाचली. त्यामध्ये पाच लाख महिलांना लाडकी बहीण योजनेतून अपात्र करण्यात येणार असल्याचे समजले. जर लाडक्या बहिणींनी त्यांना विजय मिळवून दिला असेल तर, ही फसवणूक नव्हे तर काय आहे? बहिणींनी त्यांना जाऊन विचारले पाहिजे. तीन तीन भाऊ होते ना, जाकेट भाऊ, दाडी भाऊ, देवा भाऊ. ते पुढे म्हणाले की, आतापर्यंत या योजनेतून पाच लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. जर आता त्यांना दिलेले पैसे परत घेणार असाल आणि इथून पुढे लाभ देणार नसाल तर त्यांनी दिलेली मतेही तुम्हाला दिलेल्या मतदानातून वगळणार आहात का? कारण ही तुम्ही फसवून घेतलेली मते आहेत.



**ईडी, इनकम टॅक्स आणि सीबीआय बाजूला ठेवा आणि...**

दरम्यान शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) ९ पैकी सहा खासदार फुटणार असल्याचे दावे करण्यात येत आहेत. यावरही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. ते म्हणत आहेत की सहा-सात खासदार फुटणार. पण, हिंम्मत असेल तर फोडून दाखवा. आता शिवसैनिकाच्या संयमाचा अंत पाहू नका. कारण फोडाफोडी करायला लागलात तर कधी तुमचे डोके फुटेल कळणार नाही. माझे आव्हान आहे, जर फोडाफोडी करायची असेल तर सरकारी यंत्रणा, पोलीस, ईडी, इनकम टॅक्स आणि सीबीआय बाजूला ठेवा आणि हिंम्मत असेल तर एकतरी शिवसैनिक फोडून दाखवा, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# संपादकीय



## गृहकर्ज, वाहनकर्ज स्वस्त होणार...

गेल्या पाच वर्षांत पहिल्यांदाच आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं रेपो रेटमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने याआधीची व्याजदर कपात थेट मे २०२०मध्ये जाहीर केली होती. याशिवाय गेल्या दोन वर्षांत आरबीआयनं व्याजदरात कोणतेही बदल केले नव्हते. आता मात्र आरबीआयकडून व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर करण्यात आल्यामुळे त्याचा शेअर बाजारासोबतच भारतीय बाजारपेठेवर काय परिणाम होतो, यावर अर्थतज्ज्ञांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

**किती झाली व्याजदर कपात?**

रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय मोनेटरी पॉलिसी कमिटी अर्थात सीपीसीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आरबीआयने २५ बेसिस पॉइंटने व्याजदरात कपात केली आहे. त्यामुळे आता व्याजदर ६.५० टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. केंद्र सरकारनं यंदाच्या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केल्यानंतर आठवड्याभरातच आरबीआयनं व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आगामी काळात गृह व वाहन कर्जे स्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**गुंतवणूक, खर्च वाढवण्यावर भर**

आरबीआयच्या एमपीसी बैठकीत झालेला हा निर्णय कर्ज स्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत घरासाठी घ्यावे लागणारे कर्ज, वाहनासाठी घ्यावे लागणारे कर्ज यांच्यावरचे व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. अर्थात, ही कर्जे महाग होऊ शकतात. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी या माध्यमातून लोकांच्या हाती जास्त पैसा शिल्लक राहिल्यामुळे त्यातून गुंतवणूक वाढू शकते, बाजारात पैसा येऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.

हा निर्णय जाहीर करताना आरबीआय चे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले, गेल्या काही वर्षांत या पद्धतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फायदा झाला आहे. विशेषत: करोना काळातील आव्हानांचा भारतीय अर्थव्यवस्थेला सामना करता आला आहे. यानंतर सरासरी महागाईचा दर कमी झाला आहे. व्याजदरासंदर्भातील या धोरणाचा अवलंब केल्यानंतर आरबीआयकडून नियोजित पद्धतीनेच मार्गक्रमण करण्यात आलं, असं ते म्हणाले.

**जागतिक बाजारपेठेत काय घडतंय?**

दरम्यान, गेल्या काही दिवसांत जागतिक बाजारपेठेत घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाकडे पाहिलं जात आहे. डोनार्ड ट्रम्प यांनी नवे टेरिफ प्लॅन जाहीर केल्यानंतर जागतिक बाजारपेठेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. कॅनडा, मेक्सिको आणि चीनसाठी हे टेरिफ दर जाहीर झाले. त्यापैकी कॅनडा आणि मेक्सिकोवरील टेरिफ दर लागू करण्याची प्रक्रिया एक महिन्यासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, या अनिश्चिततेमुळे डॉलर मोठ्या प्रमाणावर वधारला असून जगातील इतर मोठ्या चलनांनी नांगी टाकली आहे. भारतीय रुपयानं ८७ या आत्तापर्यंतच्या नीचांकापर्यंत घसरण नोंदवली आहे.

**देशाचा आर्थिक विकासदर ६.७ टक्के!**

दरम्यान, RBI च्या MPC बैठकीतील चर्चेनंतर देशाचा आर्थिक विकासदर ६.७ टक्के इतका अंदाजित करण्यात आला आहे. त्याशिवाय, घाऊक बाजारपेठेतील महागाईचा दर हा ४.२ टक्क्यांच्या आसपास राहील, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं आहे.

# क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला....

ज्यांचे क्रीडा विषयक लेख वाचत मी लहानाचा मोठा झालो. ज्यांच्या लेखाने माझे क्रिकेट विश्वातील ज्ञान वृद्धिंगत झाले. ज्यांच्या लेखणीतून प्रेरणा घेऊन मी क्रीडा विषयक लेख लिहू लागलो असे ज्येष्ठ क्रीडा समीक्षक, लेखक, स्तंभलेखक द्वारकानाथ संझगिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी गुरुवारी (६ फेब्रुवारी) रोजी निधन झाले.

त्यांच्या निधनाने कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते त्या संदर्भात त्यांनी एक फेसबुक पोस्ट देखील लिहिली होती मात्र ते असे इतक्या लवकर जातील असे वाटले नव्हते. शालेय जीवनात असतानाच द्वारकानाथ संझगिरी हे नाव तोंडपाठ झाले होते. भारतीय संघाचा क्रिकेट सामना असला की त्या दिवशी सकाळी आणि क्रिकेट सामना संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सामन्यावर विश्लेषण करणारे वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचणे हा माझा आवडता उद्योग. त्यांचे क्रिकेट वरील ज्ञान तर अफलातूनच होते. सध्याच्या क्रिकेटवर भाष्य करतानाच ते आपल्याला भूतकाळात घेऊन जात अगदी पन्नास वर्षांपूर्वीच्या सामन्याचा किंवा खेळाडूंचा संदर्भ त्यांच्या लेखात



असे. त्यांचा इतके क्रिकेटचे ज्ञान असलेले लेखक विरळच. केवळ वर्तमानपत्रातच नाही तर दूरचित्रवाणीवर देखील ते क्रिकेटचे समीक्षण करत.

जवळपास पाच दशके क्रिकेटवर लेखन करून क्रिकेटप्रेमींना नवी दृष्टी देणाऱ्या द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईतील दादर येथे झाला. मुंबईत शालेय शिक्षण घेतल्यावर त्यांनी माटुंग्याच्या व्हिक्टोरिया ज्युबली कॉलेजमधून इंजिनीरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इंजीअरिंग केल्यावर त्यांनी मुंबई महपालिकेत अभियंता म्हणून नोकरीही केली पण क्रिकेट व साहित्यातील रूचीमुळे त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला.

क्रिकेटवर त्यांनी केलेले लेखन विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या लिखाणाला क्रिकेटप्रेमींनी नेहमीच पसंतीची दाद दिली. केवळ मराठीच नाही तर इंग्रजी आणि हिंदी दैनिकातून आणि साप्ताहिकातूनही ते लिहू लागले. त्यांनी अनेक क्रीडापटुंच्या मुलाखती घेतल्या. क्रीडापटुंची मुलाखत घेण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. ते क्रीडापटुंची मुलाखत घेत आहेत असे वाटतच नव्हते त्यांची मुलखात म्हणजे गप्पांचा कार्यक्रमच वाटत असे इतके मनमोकळेपणे क्रीडापटू त्यांच्यापुढे व्यक्त होत. केवळ क्रिकेट किंवा क्रीडाविषयकच नव्हे तर चित्रपट, प्रवास, पर्यटन आणि सामाजिक विषयांवर देखील त्यांनी विपुल लेखन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून २०११ पर्यंत झालेल्या सर्व क्रिकेटच्या विश्वचषकांचे त्या देशात जाऊन वार्तांकन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेटर्स आणि चित्रपट तारे तारकांवर अनेक कार्यक्रम केले. त्या कार्यक्रमाच्या निवेदनाची धुरा तेच सांभाळीत. द्वारकानाथ संझगिरी यांनी जवळपास ५० पुस्तके लिहिली. त्यातील शतकात एकच सचिन, चिरंजीव सचिन, दिलखुलास बातचीत क्रिकेटपटूंशी, खेलंदाजी, बोलंदाजी, चॅम्पियन्स, चित्तवेधक विश्वचषक २०२३, क्रिकेट कॉकटेल, क्रिकेट वर्ल्डकप हाय लाईट, कथा विश्वचषकाच्या, लंडन ऑलिम्पिक, पॉवर प्ले, स्टंप व्हिजन, संवाद लिजेंडशी, क्रिकेट गाथा, थर्ड अंपायर, इंग्लिश ब्रेकफास्ट ही त्यांची पुस्तके क्रीडाप्रेमींना खूप आवडली. द्वारकानाथ संझगिरी यांना अनेक पुरस्कार मिळाले त्यात दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखक पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार, क्रीडाविषयक लेखनासाठी विश्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या निधनाने क्रीडाविश्वासह साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे विविधांगी लेखन कायम स्मरणात राहील.

**स्तंभलेखक, समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## बंजारा समाजाच्या जन आंदोलनाला तांडा सुधार समितीचा पाठिंबाल

**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.६, किनवट (नांदेड) :** भारताच्या मानवतावादी विचार परंपरेतील समतावादी संत, संत सेवालाल महाराज यांचा चिमा गार्डन येरवडा पुणे येथे पुतळा उभारण्यासाठीचे कार्य तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी गोरसेना व बंजारा समाजाच्या वतीने १० फेब्रुवारी रोजी आयोजित मोर्चाला अखिल भारतीय तांडा सुधार समिती या उच्च विद्याविभूषित मंडळीच्या सामाजिक संघटनेने जाहीर पाठिंबा दिला असून विज्ञानवादी संत सेवालाल महाराज यांच्या पुतळ्याच्या निर्मितीसाठी आयोजित या मोर्चामध्ये वंचित बहुजन बंजारा समाजबांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन समितीच्या वतीने मीडिया प्रमुख धर्मेंद्र जाधव व नागपूर जिल्हा अध्यक्ष राजू रत्ने यांनी केले आहे. देशभरातील गोर बंजारा समाज बांधवांचे दिशादर्शक, युगपुरुष क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांचे विचार मनुवादी विचारधारेच्या परंपरेत मिसळविण्याचा प्रयत्न काही संधी साधू मंडळींकडून सातत्याने केल्या जात आहे. परंतु प्राचीन समतावादी मानवतावादी संस्कृतीचे जीवन जगणारा बंजारा समाज या जाळ्यात कधीच अडकणार नाही. त्यामुळे पुतळ्याच्या माध्यमातून संत सेवालाल महाराज यांचे विचार जनसामन्याला कळावे व इतरांनी त्यापासून प्रेरणा घेऊन धाटी जीवनपद्धतीचा अभ्यास करावा यासाठी संत सेवालाल महाराज यांचा पुतळा उभारण्याची केलेली मागणी रास्त आहे. समाजातील सर्वच संघटनांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### रमाई...

निळासूर्य लखलख
सहचारिणी रमाई
सहजचं जुळे कर
आभाळाची निळाई

संसारगाडा ओढता
जाणवे तिची धिटाई
बाबांचे पुस्तकालय
हीचं तिजला मिठाई

गोवऱ्याविकूनि त्या
करीअत्यल्प कमाई
फाटल्या प्रांक्तनाची
करत होती शिलाई

भिमराव करत होते
संविधानाची घडाई
बालपणापासून ती
करत राहिली लढाई

बाबा साहेब वडील
रमाई सारखी आई
प्रगतसूर्य आज पाहे
होय देशाची भलाई

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## जे अमेरिकेला जमते ते भारताला का जमत नाही ?

अमेरिकेत पुन्हा एकदा निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारताच निर्णयांचा धडाका लावला. पहिल्याच दिवशी त्यांनी ४२ महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेत अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे राहणाऱ्या नागरिकांना पुन्हा मायदेशी पाठवण्याचा निर्णय हासुद्धा त्यापैकीच एक. त्यातील १०४ जणांची पहिली तुकडी नुकतीच भारतात दाखल झाली. अमेरिकेत जवळपास २० हजार भारतीय अपुऱ्या कागदपत्रांविना राहात आहेत. ट्रम्प यांच्या निर्णयाने हे सर्वच जण हवालदिल झाले आहेत.

युएस इमिग्रेशन अँड कस्टमच्या इन्फोर्समेंटच्या आकडेवारीनुसार २०२४ च्या नोव्हेंबर मासापर्यंत देशात राहणाऱ्या २० हजार ४०७ भारतीयांना अमेरिकेने अवैध घोषित केले आहे. यांपैकी २४६७ भारतीय नागरिक इमिग्रेशन डिटेन्शन कॅम्प मध्ये बंद करण्यात आलेले आहेत. मेक्सिको आणि सल्वाडोर नंतर अमेरिकेत अवैधपणे राहणाऱ्यांमध्ये भारतीयांचा क्रमांक आहे. अमेरिकेत अवैधपणे राहणाऱ्या भारतीयांच्या रोजगारावर आणि एकूणच अस्तित्वावर संकट कोसळल्याने भारतातील नागरिकांना त्यांच्याविषयी सहानुभूती असली तरी त्यांनी तेथील कायदा मोडला आहे ही बाब सुद्धा दुर्लक्षून चालणार नाही.

देशात अवैधपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांच्या विरोधात ट्रम्प यांनी घेतलेल्या कठोर निर्णयामुळे भारतीयांची मने दुखावली असली तरी अमेरिकन नागरिकांनी ट्रम्प यांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. फ्रांस आणि इंग्लड या दोन्ही बलाढ्य देशांनी अन्य देशातील नागरिकांना देशात अवैधपणे वास्तव्य दिल्यामुळे त्याची विषारी फळे चाखली आहेत, त्या धर्तीवर ट्रम्प यांनी देशहितासाठीच हा निर्णय घेतल्याने त्यांच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे. याउलट स्थिती आज भारतात दिसत आहे. भारतात उअअ आन छठउ कायदा लागू करण्यात येणार असल्याची घोषणा होताच देशातील एका समाजाने देशभर निदर्शने आणि आंदोलने सुरु केली. या समाजाच्या म्होरक्यांनी कायद्यांविषयी नीट जाणून न घेता लोकांमध्ये गैरसमज निर्माण करून लोकांची माथी भडकवण्याचे काम केले. 'आम्ही आमच्या नागरिकत्वाची कागदपत्रे दाखवणार नाही' असा एक सूर या समाजाकडून दिला गेला. विरोधी पक्षांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी आगीत तेल ओतण्याचे काम केल्याने या कायद्याद्वारे घुसखोरांवर कारवाई करणे सरकारलाही शक्य झाले नाही. असे असले तरी देशातील अवैध घुसखोरीविरोधात असलेल्या कायद्याचा वापर राज्यांतर्गत सुरक्षा विभागाकडून किती प्रमाणात केला जातो हे पाहणेही गरजेचे आहे.

भारत आणि बांगलादेश यामधील सुमारे २८०० किलोमीटर सीमेवर भारताने काटेरी तारांचे कुंपण बसवले आहे तरीही आजतागायत १० कोटीहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असताना सीमा सुरक्षा दलातील अधिकारी काय करत आहेत ? याचीही चौकशी होणे आज गरजेचे आहे. भारतातील मुस्लिमांची श्रद्धास्थाने असलेल्या मशिदी आणि दर्गे यांच्या उत्सवांच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या बांगलादेशींपैकी अनेक जण पुन्हा त्यांच्या देशात जातच नाहीत असेही आता उजेडात आले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकून जगात पहिला क्रमांक पटकावला ज्यामध्ये दुर्दैवाने बांगलादेशी घुसखोरांचाही महत्वाचा वाटा आहे. भारतातील गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात भरणा आहे. भारतात राहून देशविरोधी कारवाया, अमली पदार्थांची तस्करी, दंगली घडवणे, लूटमार करणे, भूखंड बळकावणे, अनैतिक व्यवसाय यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या हाती सापडत आहेत. काही दिवसांपूर्वीच मुंबईत अभिनेता सैफ अली खान याच्यावर जीवघेणा हल्ला करणाराही बांगलादेशी गुंडच होता. झोपडपट्टी दादा, लोकप्रतिनिधी आणि दलाल यांच्या मदतीने या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि रोजगाराची सोय होते. काही दिवसांतच त्यांना बनावट मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड बनवून मिळते त्यामुळे बांगलादेशी असल्याचा संशय असूनही त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांना अवघड जाते. खरेतर बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी रोखावी यासाठी विशेष शोधमोहीम प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत राबवण्यात यावी, असे पोलिसांना आदेश आहेत. यामध्ये बांगलादेशी व्यक्ती शोधणे, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, त्यांचे साथीदार शोधणे, तसेच त्या सर्वांना परत पाठवणे आदी कामे येतात; मात्र या सर्वांत अधिक वेळ जात असल्याने या आदेशाला पोलिसांकडूनच केराची टोपली दाखवली जात आहे.

बांगलादेशात हिंदूंना वेचून त्यांचा छळ केला जात आहे, स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, हिंदूंची मंदिरे फोडली जात आहेत आणि आपण मात्र देशाला पोखरणाऱ्या या बांगलादेशी घुसखोरांबाबत कोणतीही विशेष राबवत नाही आहोत. आतातर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही राज्यातील घुसखोरांविरोधात कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. घुसखोरांच्या विरोधात पोलिसांकडून राबवल्या जाणाऱ्या नरमाईच्या धोरणावर न्यायालयानेही ताशेरे ओढले आहेत. या सर्वांचा विचार करता आज जे अमेरिकेला जमते ते भारताला का जमू शकत नाही असा प्रश्न यानिमित्ताने नागरिकांकडून विचारला जात आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## विशेष मोहिमांद्वारे नवी मुंबईत सखोल स्वच्छतेला महत्व

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.६, नवी मुंबई :** महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मॉर्निंग सायकलींग करीत स्वच्छता कामाच्या प्रत्यक्ष पाहणीला सुरुवात केली असून या पाहणी दौऱ्यात दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी सर्वच विभागांमध्ये करण्यात येत आहे. या अनुषंगाने मुख्य रस्ते व दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली सर्व विभाग कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.

यानुसार दिघा विभागात सुभाष नगर ते सोल्जर कंपनी भागातील रस्त्याची तसेच पदपथ व दुभाजकांची सखोल स्वच्छता करण्यात आली.



यामध्ये विशेषत्वाने रस्त्यांच्या कडेला साचलेली माती व त्यामुळे तयार होणारी धूळ यावर लक्ष केंद्रीत करीत माती उचलून घेण्यात आली. त्याचप्रमाणे प्रक्रियाकृत पाण्याने रस्ते, पदपथ स्वच्छता तसेच आधुनिक स्प्रेईंग मशीनद्वारे हवेतल्या धूलीकणांवर प्रतिबंधासाठी प्रक्रियाकृत पाणी फवारणी करण्यात आली. अशाच प्रकारची मोहीम कोपरखैरणे भागात से.११ व १२ येथील मुख्य रस्त्यांवर राबविण्यात येऊन धूलीकणांना प्रतिबंध करण्यात आला तसेच माती उचलून व कशीही वाढलेली सुकलेली झुडूपे काढून परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे वाशी विभागात से.१० येथील सार्वजनिक रुग्णालयाचा बाह्य परिसर डीप क्लीनिंग ड्राईव्ह राबवत सखोल स्वच्छ करण्यात आला. या मोहीमांमध्ये स्वच्छताप्रेमी नागरिकांचा तसेच एनएसएसच्या विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी सक्रीय सहभाग लाभताना दिसत आहे.

स्वच्छता ही प्रत्येकाची वैयक्तिक तसेच सामुहिक जबाबदारी असून त्यादृष्टीने लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यावर भर देण्यात येत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### दक्ष गायकवाडची टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित १४ वर्षे आतील राज्य अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथे उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये निफाड येथील क्रीडा सह्याद्रीचा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची महाराष्ट्र संघात व राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचे निफाड तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे. राज्य स्तरीय १४ वर्षे आतील स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी, वूमन धनश्री गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे इत्यादी उपस्थित होते. क्रीडा सह्याद्री चा खेळाडू कु. दक्ष याची नाशिक संघात निवड झालेली होती. त्याने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळ करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची ऑलराऊंडर म्हणून महाराष्ट्र संघात निवड झालेली असून, राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा मथुरा येथे होत आहे. दक्ष गायकवाड त्याची महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल भारतीय टेनिस महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, उपाध्यक्ष विलास गिरी, धनश्री गिरी, धनंजय लोखंडे व नाशिक जिल्हा विलास गायकवाड, बाळकृष्ण वाळुंज, माहिती अधिकार पत्रकार संघाचे सचिव विनोद गायकवाड ,राहुल कुलकर्णी, क्रीडा सह्याद्री फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड क्रीडा सह्याद्री सदस्य, रमेश वडघुले, प्रतीक्षा कोतकर, कीर्ती कोटकर, निलम बेंडकुळे, विजय घोटेकर , लखन घडमाळे यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चरस, एम.डी व गांजा हा अंमली पदार्थ विक्री करणारे ४ जण ताब्यात

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** परीमंडळ ३ कल्याणमध्ये अवैध धंदयावर कारवाई करणेकरिता विशेष पथक स्थापन करण्यात आलेअसून सदर पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण व पोलीस पथक हे संयुक्तरित्या खाजगी वाहनाने गस्त करीत असताना १) मानपाडा पोलीस ठाण्याच्या हददीत सुदर्शन मार्बल समोर, सावित्रीबाई फुले नाटयगृह जवळ, एम.आय.डी.सी. रोड, डोंबिवली पूर्व येथे एक इसम नामे सनिल श्रीनाथ यादव, वय २५ वर्ष रा. रूम नं २०२, नांदीवली टेकडी, आनंद बंगलो डोंबिवली पुर्व हा त्यांचे ताब्यात एकुण ८.४८ ग्रॅम वजनाचा १६ हजार ५०० रूपये किंमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ विक्री करण्याचे उददेशाने जवळ बाळलेला मिळुन आल्याने त्याचेवर मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३६/२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २१ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २) बाजारपेठ पोलीस स्टेशन हददीत दुर्गामाता चौक, भटेला तलाव येथील मोकळ्या जागेत, कल्याण पुर्व येथे इसम नामे शंकर महादेव गिरी, वय ४६ वर्षे, धंदा मजुरी रा. मुपो. टाकळी अम्या, ता. आष्टी, जि. बीड हा त्यांचे ताब्यात एकुण ९ किलो ९५० ग्रॅम वजनाचा १,००,०००/- रूपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याचे उददेशाने जवळ बाळलेला मिळुन आल्याने त्याचेवर बाजारपेठ पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३२/२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३) डोंबिवली पोलीस स्टेशन हददीत राजाजी पथ, स्वामी नारायण मंदिरा बाजुस असलेल्या मोकळया जागेत, रामनगर, डोंबिवली पूर्व येथे इसम नामे १) सचिन एकनाथ कावळे, वय ३२ वर्षे, रा. रूम नं ०२, वसंत किणे चाळ, प्रगती कॉलेज मागे, डी.एन.सी. रोड डोंबिवली पुर्व २) अमन विरेदं गुप्ता उर्फ पप्पु, वय १६ वर्षे, रूम नं ०१, सुगंधी चाळ, दत्तनगर, डोंबिवली पुर्व यांनी मिळून त्यांचे ताब्यात एकुण २३.५३ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ व १० ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ एकुण ९३,९४३/- रूपये किंमतीचा अंमली पदार्थ विक्री करीता सोबत बाळगल्याचे मिळुन आल्याने त्याचेवर डोंबिवली पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ११७/२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क) सह २० (अ), २१ (ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तसेच परिमंडळ ३ कल्याण मध्ये १ जानेवारी २०२५ ते आजपावेतो विशेष अंमली पदार्थ कारवाई पथकामार्फत अंतर्गत एकुण १३ गुन्हे दाखल असुन सदर गुन्हयात १९ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. त्यांचेकडुन ६३ ग्रॅम एम. डी. पावडर, २३२ कोडीनयुक्त बॉटल व नशेच्या गोळया तसेच ४७ किलो ०४४ ग्रॅम वजनाचा गांजा असा एकुण १२ लाखापेक्षा जास्त रुपये किमतीचा अंमली पदार्थ मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त, ठाणे शहर आशुतोष डुंबरे सो., पोलीस सह आयुक्त, ज्ञानेश्वर चव्हाण सो, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, संजय जाधव सो, यांचे आदेशाने, अतुल उत्तमराव झेंडे पोलीस उप आयुक्त परिमंडळ. ३ कल्याण यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि प्रशांत चव्हाण, पोना शांताराम कसबे, पोशि गौतम जाधव, पोशि राजेंद्र सोनावणे यांच्या विशेष पथक तसेच डोंबिवली पोलीस ठाणेचे वपोनि नावदवाड, सपोनि / कोकरे, मानपाडा पो. स्टे. चे पोनि / गुंड, सपोनि / राळेभात व बाजारपेठ पोलीस ठाणेचे पोनि / दुकले, सपोनि राठोड यांचेकडुन कामगिरी करण्यात आली आहे.

### पंचशील प्राथमिक विद्यालय हदगाव या शाळेत आनंद नगरी साजरी



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०७, हदगाव (नांदेड) :** हदगाव येथील पंचशील प्राथमिक शाळा येथे आनंद नगरीचे उद्घाटक संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले प्रमुख अतिथी श्रीकृष्ण देव उखळाई मठाचे मठाधिपती योगी बापू अनाथाची आई रूपाआई कवीश्वर माजी नगराध्यक्ष जीवनराव उर्फ मुन्ना देशमुख होमगार्ड संघटनेचे तालुकाध्यक्ष मधुकरराव देशमुख शाळेचे मुख्याध्यापक अजय नथमल काबरा यांच्या उपस्थितीत आनंद नगरी कार्यक्रमाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. चिमुकल्या इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी जवळपास ५१ स्टॉल खाऊचे लावलेले होते. सर्वांनी पदार्थाचा आनंद घेतला. त्यामध्ये गुलाब जामुन पाणीपुरी भेळपुरी ते पापडीपर्यंतचे पदार्थ दिसून येत होते सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इटूबोने रामकिशन, पद्मावार गजानन, कदम सुधाकर वाघमारे रंगराव,फाजगे परमेश्वर भालेराव चंद्रमुनी, रोकडे सुरज, शिरगिरे किरण, जगडे मधुकर,समीर शेख, देशमुख वंदना देशमाने वनिता,कमठाणे अपर्णा, सिंगनवाड स्वाती, मोरे गोदावरी, अंजली पोलावार, स्वप्निल वाघमारे, पूजा जंगवाड, पवन धात्रक, जाधव सुधाकर मामा सर्व शिक्षक शिक्षिका यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी, श्रीयश रेस्टॉरंटचे राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** पंढरपूर टेंभुर्णी पुणे रोडवरील करकंब तालुका पंढरपूर येथे हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी व श्रीयश रेस्टॉरंटचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

यावेळी आमदार अभिजीत पाटील, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, मनसेचे नेते अविनाश अभ्यंकर, सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे, भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, कोळी महासंघाचे नेते अरुण कोळी, ज्येष्ठ नेते नानासाहेब कदम यांच्यासह पंढरपूर शहरातील आजी-माजी नगरसेवक व विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विठुरायाची पावनभूमी पंढरी नगरीत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी मुंबई पुण्याच्या धरतीवर टेंभुर्णी-पुणे रोड करकंब तालुका पंढरपूर येथे पंचतारांकित दर्जाचे



हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी आणि हॉटेल श्रीयश रेस्टॉरंटची निर्मिती मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या संकल्पनेतून धोत्रे परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.हॉटेल ग्रँड या पंचतारांकित हॉटेलची १ लाख ४ हजार स्क्वेअर फुट जागेत निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये ५० रूम, ३ हजार स्क्वेअर फुटचा प्रशस्त हॉल, पंचवीस हजार स्क्वेअर फुट लॉन गार्डन, स्विमिंग पूल, पार्किंगची सोय करण्यात आली आहे. याचबरोबर या ठिकाणी हॉटेल श्रीयश रेस्टॉरंटची मुंबईच्या धरतीवर निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये पंचतारांकित हॉटेल प्रमाणे विविध प्रकारच्या जेवणाचे मेनू मिळणार आहेत. याद्वारे १०० तरुणांना रोजगार मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नजीक असलेल्या पंचतारांकित दर्जाचे हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी आणि श्रीयश रेस्टॉरंट भाविकांनी नागरिकांसाठी खुले झाले आहे. एक नेता एक झेंडा एक पक्ष हे तत्व बाळगून काम करणारे महाविद्यालयीन जीवनापासून राज ठाकरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी उभारलेल्या हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी आणि श्रीयश रेस्टॉरंटचे उद्घाटन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात पार पडले.

यावेळी मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी माध्यमांशी संवाद साधताना 'श्रीकृष्ण सुदामाच्या भेटीला आले आहेत. असे उद्गार काढले. माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना बळ देण्याची काम राज साहेब ठाकरे यांनी केल्याच्या भावना व्यक्त केल्या.

### जव्हार येथे रक्तदान शिबिर सपन्न




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०७, जव्हार (पालघर) :** शुक्रवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय जव्हार, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत रक्तदान केले.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. सदर शिबिरास पतंगशहा कुटीर रुग्णालय जव्हार येथील रक्तपेढीचे डॉ. निरंजन साबदे, श्रीराम धुरी (रक्तकेंद अधिकारी), किरण शिंदे (ICTC समुपदेशक) उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.आर मेश्राम यांनी रक्तदान श्रेष्ठ दान यावर मार्गदर्शन केलं. तसेच आयोजकांचे अभिनंदन करत, रक्तदान करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि कर्मचार्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.मंगेश भले, प्रा.अभिजीत बांबरे तसेच विद्यार्थी प्रतिनिधीनी केले. अशा सामाजिक कार्यांमुळे समाजात जागरूकता आणि एकोप्याचा संदेश मिळतो, असे सर्व उपस्थितांनी मत व्यक्त केले.

## जोखीम स्वीकारत उद्योजक निर्माण होतात - प्रा.डॉ.बाबासाहेब सायमोते



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि अग्रणी महाविद्यालय अंतर्गत उद्योजकता विकास संधी आणि आव्हाने या विषयावर दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यासाठी शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ.बाबासाहेब सायमोते यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी महाविद्यालय प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांच्या हस्ते अतिथिंचे स्वागत करण्यात आले.

मार्गदर्शन करताना डॉ.सायमोते म्हणाले, मानवी उत्क्रांतीच्या आरंभी अश्मयुगापासून संशोधन, सत्ताप्राप्ती, संघर्ष आणि सुरक्षा संसाधने निर्मिती करत आला आहे. मानवी जीवन विकास वाटचालीत माणसाच्या अस्तित्वाची लढाई सुरू झाली. याद्वारे विचार आणि कृती करणारा माणूस विज्ञान तंत्रज्ञान आधारे व्यवसाय आणि उद्योजकतेकडे वळला. २१ शतकात वैज्ञानिक उत्क्रांती झाली. दूरध्वनी आणि भ्रमणध्वनी संवाद क्षेत्रात प्रदीर्घ काळ परंपरागत कंपन्या पिछाडीवर जाऊन आधुनिकतेची जोड देत नव्या सुविधा देणाऱ्या उद्योजक कंपन्या उद्योग स्पर्धेत उतरून ग्राहकांना चांगल्या सुविधा देत अधिक प्रसिद्ध झाल्या. यातून उद्योजक आपले वेगळेपण सिद्ध करत ग्राहकांची गरज पूर्ण करत वेगळेपण सिद्ध केले.

जगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उद्योजकांनी जोखीम स्वीकारत आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवे तंत्रज्ञान कौशल्यांनी परिपूर्ण होत यशस्वी उद्योजक बनावे. भारताचे उद्योग क्षेत्रातील वैशिष्ट्य म्हणजे नैसर्गिक दृष्ट्या संपन्न आणि समृद्ध असणाऱ्या देशात उद्योजक निर्माण होतात. परंतु उद्योग टिकून ठेवण्यासाठी व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करण्यात कमी पडतात. या ऐवजी पूर्वनियोजन, आधुनिकतेची जोड देत आव्हानांचा सर्व बाजूनी सामना करत प्रतिकूल परिस्थितीत अनुकूलता आणून आपल्या व्यवसायात सिद्धी मिळवता येते असा मूलमंत्र दिला.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, जगाच्या बाजारापेठेत मोठे उद्योजक ही आर्थिक संकटात सापडतात.कोरोना सारख्या महाआरोग्य संकटात शेतकऱ्याने अग्रभागी राहत आपले उद्योग कौशल्य कामी आणत जगात नुसते पैशाने श्रीमंत होऊन चालणार नाही तर मातीशी इमान ठेवत कष्टकरी शेतकऱ्यांना सर्वोच्च स्थानी जाता येते असे नमूद केले. समारंभाचे प्रास्ताविक,परिचय व उद्देश सांगताना कौशल्य विकास विभाग प्रमुख प्रा.अमीर इनामदार म्हणाले-उद्योग क्षेत्रात आपले अस्तित्व टिकून राहण्यासाठी पदवी शिक्षण घेणाऱ्या तरुणाईला कौशल्य- प्रशिक्षण सोबतच नेटक्या मार्गदर्शनची गरज आहे,हीच गरज ओळखून आजचे उद्योजकता विकास हा विषय नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करणारे डॉ बाबासाहेब सायमोते यांचे व्याख्यान मैलाचा दगड ठरेल.

यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. निकिता पवार, अग्रणी महाविद्यालय योजना प्रमुख प्रा.नयना ओंबळे, भूगोल विभागप्रमुख प्रा.अशाली फडतरे, प्रा.रोहिणी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा.सीमा पवार यांनी आभार प्रा. सुजाता कारोटे यांनी केले. विद्यार्थी अक्षय देशमाने याने छायाचित्रण केले. यावेळी सर्व विभागातील पदवी शिक्षण विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे कर्करोग तपासणी वाहन लोकार्पण सोहळा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, ठाणे :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने दि.४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या जागतिक कर्करोग दिनाच्या अनुषंगाने राज्यात पुढील महिनाभर कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत कर्करोग तपासणी करिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कर्करोग तपासणी वाहनांचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर, सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन तसेच जिल्ह्यातील इतर मंत्री महोदयांच्या उपस्थितीत दि.०९ फेब्रुवारी २०२५ रोजी नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे संपन्न होणार आहे.

तरी नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांनी केले आहे.

## महापालिकेच्या थकबाकी रक्कमेपोटी निवासी मालमत्ता, बिगर निवासी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महापालिकेने थकबाकीदारांवर कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या आदेशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली (पूर्व) ६/फ प्रभागात थकबाकीदारांच्या निवासी व बिगर निवासी मालमत्तांवर सिलिंगची कारवाई करण्यात आली.

महापालिकेच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, अधिक्षक महेश पाटील, वरिष्ठ लिपिक दौलत जांभेकर, आणि लिपिक शशिकांत म्हात्रे यांच्या पथकाने ही कारवाई राबवली.डोंबिवली (पूर्व) खंबालपाडा, कल्याण रोड येथील कोळीवाडा हॉटेल थकबाकीपोटी सिल करण्यात आले आहे. या हॉटेलची थकबाकी रु. १,७३,२७२/- इतकी असून, वारंवार नोटीस देऊनही रक्कम न भरल्याने अखेर महापालिकेला कारवाई करावी लागली. तसेच डोंबिवली (पूर्व) रेल्वे कॉलनी, कल्याण रोड येथील सद्गुरू बिल्डिंग मधील विकासक जगदीश वाघ यांच्या मालकीच्या दोन सदनिका क्रमांक ४०१ आणि ७०१ यांना महापालिकेने सिल ठोकले आहे.

या सदनिकांची थकबाकी रु. २०,९६,४३३/- एवढी असल्याने महापालिकेने ही कठोर कारवाई केली. महापालिकेने सर्व थकबाकीदारांना लवकरात लवकर कर भरावा, अन्यथा अशीच कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. पुढील काही दिवसांत आणखी काही मालमत्तांवर ही महापालिकेच्या कारवाईचा हुकूम लागण्याची शक्यता आहे.

अक्षराज

४ बुलडाणा, शनिवार, दि.०८ फेब्रुवारी २०२५ संमिश्र

# टपाल नाका येथे महापालिकेच्या वतीने मोठी अतिक्रमण कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.७, पनवेल :** टपाल नाका येथे रस्ता रूंदीकरणासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार, स्वत: अतिक्रमण उपायुक्त रविकिरण घोडके व प्रभाग ड पनवेलच्या सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक ७ फेब्रुवारी रोजी नऊ गाळ्यांवरती निष्कांसन कारवाई करण्यात आली. जेसीबी, डंपर, पोखलॅडच्या साहाय्याने सुमारे २ हजार ३६ स्वेअर फूट बांधकामांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने यावेळी तोडक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अनेक वर्षापासूनचा टपाल नाक्यावरील रस्ता रूंदीकरणाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे.



यावेळी कारवाईवेळी सहाय्यक संचालक नगर रचना केशव शिंदे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, तसेच प्रभाग अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, महापालिकेचे अधिकारी सुधीर सांळुखे, राजेश कर्डिले, जयराम पादीर, प्रितम पाटील, संदिप पवार तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. तसेच पनवेलचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजरत्न खैरनार, वाहतुक वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पाटील व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

टपाल नाका येथे दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी वाढू लागल्याने याठिकाणी रस्ता रूंदीकरण करणे महत्वाचे होते. याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात दोन रिट याचिका सादर करण्यात आल्या होत्या, परंतु दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने सदर दोन्ही याचिका सुनावाणी अंती फेटाळून लावलेल्या आहेत. त्यामुळे रस्ता रूंदीकरण कामात अडथळा येणाऱ्या नऊ गाळयांवर आज पालिकेच्या वतीने डंपर, पोखलॅड, जेसीबीच्या साहाय्याने मोठी निष्कांसन कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे टपाल नाक्यावरील वाहतुकीची समस्या सोडविली जाणार असून पनवेल, करंजाडे मधील होणारी वाहतुक जलद होणार आहे. या कारवाईमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# जाळीचा देव - यात्रा महोत्सव



विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर वसलेले जाळीचा देव हे भोकरदन तालुका व जालना जिल्ह्यातील एक तिर्थ क्षेत्र. या क्षेत्री महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी काही काळ वास्तव्य केले. हे तिर्थक्षेत्र अजिंठ्या पासून २८ किलोमीटर तर बुलढाण्यापासून २५ किलोमीटर अंतरावर आहे.

अतिशय निसर्गरम्य असे हे तिर्थस्थान चारी बाजूंनी डोंगररांगा वृक्षवेलींनी बहरलेले आहे. या क्षेत्री महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी महाराष्ट्र भ्रमण करत होते. तो काळ म्हणजे १२ वे शतक. स्वामी गंगातीराकडून कनाशी, भडगाव, पाचोरा, शेंदुर्णी, चांगदेव, हरताळा येथे आले व तेथून सावळदबाऱ्याच्या डोंगराळ भागातून वरील बाजूस वालसावंगी मार्गे भोकरदन तालुका येथे जाण्या अगोदर वालसावंगीच्या पूर्व दिशेस एका गावात रुळले अर्थात निवास केला म्हणून त्या गावाला त्यांच्या वास्तव्या मुळे मासरूळहे नाव पडले. गाव व गावाशेजारी स्वामी एका शेतात निसर्ग रम्य ठिकाणी जाऊन वास्तव्य करत म्हणून तिथेही स्वामींचे मंदिर आहे त्याला देवाचा मळा ओळखले जाते. मासरूळ या गावी स्वामी चक्रधरांचे भव्य मंदिर आहे. व तेथेही त्यांनी अनेक ळीला केल्या, व तेथून पुढील भ्रमण केले. तर या सावळदबारा व टेकडीवरील घनदाट अरण्यात करवंदाच्या जाळीच्या सावलीत विश्रांती घेण्यासाठी थांबले. त्या घनदाट जाळीमध्ये स्वामींना दोन वाघाची पिल्ले दिसले. त्याच्या धैर्यवान व मायाळू स्वभावामुळे त्यांनी पिल्लांना मांडीवर घेऊन अगदी प्रेमाने कुरवाळले. तेवढ्यात त्या ठिकाणी वाघिन येऊन गर्जना करू लागली परंतु, स्वामींचा मायाळू स्वभाव व कृपा कटाक्ष नजर बघून वाघीण एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणे शेपटी हलवू लागली. ही घटना अर्थात लीळाया वृक्षवेलींनी बहरलेल्या जाळीमध्ये घडली, म्हणून या पवित्र ठिकाणाला जाळीचा देव हे नाव पडले. तेथील गुराखी अजूनही दर पौर्णिमेला त्या स्थानावर जाऊन नारळ बांधतात. कालांतराने तेथे भव्य मंदिर निर्मिती झाली व एक पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून नावारूपाला आले. व या ठिकाणी दरवर्षी माघ शुद्ध पौर्णिमेला भव्यरथ महोत्सव व पालखींचे आयोजन केले जाते. हळूहळू या रथ महोत्सव व पालखीस भव्य स्वरूप प्राप्त झाले. त्या ठिकाणी यात्रा भरू लागली. हा यात्रामहोत्सव माघ शुद्ध पौर्णिमेच्या दोन-तीन दिवस अगोदर व पौर्णिमेनंतर चार-पाच दिवस असा जवळपास आठ दिवस कायम राहतो.

या यात्रा महोत्सवादरम्यान आजूबाजूच्या खेड्यातील छोटे छोटे दुकानदार आपापले दुकाने घेऊन तेथे लावतात. कटलरी, लहान मुलांचे खेळणे, वेगवेगळ्या प्रदर्शनीय वस्तूंचे दुकान तेथे थाटल्या जातात. व त्याचबरोबर चहापाणी, नास्ता, भोजनसाठी हॉटेल उभारल्या जातात. त्याचबरोबर फरसाण व प्रसादाचीदुकाने ही असतात त्यात विशेषत: रेवडी, गोडशेव हे सर्व जण चवीने खातात. मोठ्या पडद्याच्या टॉकीज, तमाशा मंडळ, रहाट पाळणे यात्रेकरूंचे मनोरंजन करतात. सिने- कलाकार सुद्धा तेथे भेटीसाठी येतात. सर्कस, मौत का कुवा, यासारखे धाडसी खेळही येथे खेळले जातात. त्यामुळे लहान मुले, तरुण-तरुणी तसेच वृद्ध मंडळी या रथ-महोत्सव, पालखी व यात्रेत हजारोंच्या संख्येने सहभागी होतात. पंचक्रोशीतीलच नव्हे तर महाराष्ट्र व संपूर्ण भारतातील भाविक तथा हौशी मंडळी यात्रेत सहभागी होतात व यात्रेचा आनंद लुटतात. आजूबाजूच्या खेड्यातील भाविक छान पायी-पायी यात्रेला येतात. तेथील निसर्गरम्य धार्मिक सोहळ्याचा व लोक जीवनाचा एक सुखद अनुभव घेतात. सर्वसामान्य गोरगरीब कलाकार व्यावसायिक मंडळीसाठी ही यात्रा एक व्यावसायिक विचार लक्षात घेता उत्पन्नाचे साधन बनून बनवून जाते. छोट्या छोट्या वस्तू सुतार, लोहार तसेच इतर कलाकार बनवून विक्रीसाठी आणतात त्यातून त्यांना अर्थप्राप्ती होते व कुटुंबासाठी अर्थात मदत होते. जाळीचादेव येथील आकर्षणाचा विषय म्हणजे महानुभाव पंथांचे अनुयायी दीक्षाधारी महंतांचे आश्रम. यामध्ये दररोज हजारो लोकांची राहण्याची व्यवस्था केली जाते. त्याचबरोबर महाप्रसादाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अन्नदान केल्या जाते. तर या वैशिष्ट्यपूर्ण बरोबरच महानुभाव पंथाचे प्रणेते चक्रधर स्वामी व पंथांची माहिती आपणास सांगायची झाल्यास, महानुभाव हा महाराष्ट्रातील एक प्रमुख धर्मपंथ अथवा संप्रदाय म्हणून पंथांची ओळख आहे.

महानुभव पंथाचे प्रणेते श्री चक्रधर स्वामींनी सूत्रपाठया ग्रंथात नेमकेपणाने तत्त्वज्ञान मांडले आहे. ज्ञान व भक्ती यांना प्राधान्य देणाऱ्या या महानुभाव पंथाला महात्मा पंथ, भट मार्ग, अच्युत मार्ग, जय श्रीकृष्ण पंथी या नावाने सुद्धा ओळखले जाते. श्रीकृष्ण ही महानुभाव पंथीयांचे एकमेव उपास्य दैवत आहे. महानुभाव पंथामध्ये पंचकृष्ण ही संकल्पना आहे. या पंथात परब्रम्ह परमेश्वराची पाच अवतार मानले जातात. पंथांचे वांड:मय या पंचकृष्णाच्या भोवती निर्माण झाले असून, सूत्रपाठ या महानुभावांच्या तत्त्वज्ञान पर ग्रंथात पंचकृष्ण नावाचे स्वतंत्र प्रकरण असून त्यातील उल्लेख,

जैसे द्वापरी श्रीकृष्ण चक्रवर्ती ।
तैसे सह्याद्री दत्तात्रय प्रभू ।।
जैसे द्वारावती ए श्री चांगदेव राऊळ ।
जैसे दिधपुरी श्री गुंडम राऊळ ।
जैसे प्रतिष्ठांनी श्री चांगदेव राऊळ ।।

श्रीकृष्ण महाराज, श्रीदत्तात्रेयप्रभू, श्रीचांगदेवराऊळ, श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधरस्वामी - असे पाच परमेश्वर अवतार आहेत या पंचवतारांना महानुभव पंथात पंचकृष्ण असे संबोधतात. त्याचबरोबर महानुभावांचे चरित्र ग्रंथ आहेत. त्यापैकी लीळाचरित्र हा म्हाईमभटाचा चरित्रग्रंथ असून मराठीतील हा आद्य ग्रंथ म्हणता येईल. या ग्रंथांची रचना तीन भागात झालेली आहे. एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध हे तीन भाग आहेत. महानुभाव पंथांचे प्रणेते श्री चक्रधर स्वामी यांचे विस्तृत चरित्र, त्यांच्या आठवणी व अख्यायिका यात समाविष्ट आहेत. लीळाचरित्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चक्रधरांचा वावर समाजाच्या सर्व स्तरातून होत असल्यामुळे केवळ त्यांच्याच विषयी नाही तर तत्कालीन महाराष्ट्राचे चरित्र चित्र दिसून येते. त्या वेळेचा समाज, चालीरीती, व्रतवैकल्य, सणवार, खानपान, वस्त्रप्रावणे, नाणी-गाणी, व्यापार, उद्योग, व्यवसाय यांचे चित्र दिसून येते व यातून महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडते. त्यातील एक सांस्कृतिक वारसा म्हणजे यात्रा होय.

अशाप्रकारे जाळीचा देव येथील माघ शुद्ध पौर्णिमेचा यात्रा महोत्सव, रथ व पालखी हा एक आनंदाचा उत्सव म्हणून महानुभाव पंथीय तसेच इतर सर्व भाविक अगदी आनंदात साजरा करतात. भाविक येथे हजारोंच्या संख्येने सहभागी होतात व तेथील धार्मिक व आनंदाच्या सोहळाचा सुखद अनुभव घेतात. या पवित्र तिर्थ स्थळाला व यात्रा महोत्सवाला आवश्य भेट द्या.

**दंडवत प्रणाम...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# पपईच्या बिया फेकताय? तज्ज्ञांनी सांगितले पपई बियांसह खाण्याचे फायदे



कमी बिया असलेला पपई मिळावा यासाठी वाट बघणारे तुमच्या-आमच्यासारखे सामान्य जन; जर आपल्याला कुणी सांगितलं की, तुम्हाला उलट पपई बियांसह खाल्ल्यावरच फायदा होऊ शकतो, तर तुमचा विश्वास बसेल का? आम्हालाही खरं वाटलंच नव्हतं. पण, सोशल मीडियावर मात्र पपईच्या बिया खा, असं ओरडून ओरडून सांगणाऱ्यांची गर्दी वाढली होती. अशा वेळी खरं काय ते समोर आणायचं, असं आम्ही ठरवलं आणि तज्ज्ञांकडून याविषयी माहिती घेतली. याच माहितीच्या आधारे आपण आज पपईच्या बियांचं सेवन करावं का? केल्यास त्यानं फायदा होईल की अपाय हे सगळं जाणून घेऊ

**पपई खाण्याचे फायदे काय?**

झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटल, मुंबई येथील आहारतज्ज्ञ जिनल पटेल यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार, पपईमध्ये मुबलक प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे व एन्झाइम्स असतात; ज्यामुळे पचनास मदत होते, प्रतिकारशक्ती वाढते आणि त्वचेचे आरोग्यही सुधारण्यास साह्य मिळते. त्याशिवाय पपईमध्ये अ व क ही जीवनसत्त्वे आणि फोलेटसारखे पोषक घटकदेखील असतात. पपईमधील प्रथिने पचनास मदत करतात आणि शरीरातील जळजळ कमी करण्यासाठी फायदेशीर म्हणूनही ओळखली जातात. पटेल यांनी असंही म्हटलं की, जर डॉक्टरांनी सांगितलेल्या प्रमाणात आपण पपईचे नियमित सेवन केले, तर डोळ्यांच्या आरोग्यापासून ते कर्करोगाचा धोका कमी करण्यापर्यंत बहुढंगी फायदे मिळू शकतात.

**पपईच्या बिया खाव्यात का?**

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या सर्व दाव्यांविरुद्ध माहिती आहारतज्ज्ञ पटेल यांनी आम्हाला दिली. त्या म्हणतात की, पपईच्या बिया खाल्ल्यानं पचनास त्रास होऊ शकतो. त्याशिवाय ओटीपोटात दुखणे, त्रास होणे, पोटात गोळा येणे अशी लक्षणेसुद्धा दिसून येऊ शकतात. त्यामुळे बियांशिवाय पपई खाणं हे सर्वोत्तम म्हणता येईल.

मात्र, दुसरीकडे मदर्स लॅप आयव्हीएफ सेंटर नवी दिल्ली आणि वृंदावन येथील खतऋ स्पेशलिस्ट, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शोभा गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, पपईच्या बिया खाण्याचे काही फायदे आहेत. विशेषतः महिलांसाठी याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत, असे म्हणता येईल. पपईच्या बियांमध्ये एन्झाइम्स, अँटिऑक्सिडंट्स व आरोग्यदायी चरबी हे शरीरास आवश्यक घटक असतात. त्यामुळे यकृताचे कार्य सुधारू शकते. तसेच यातील दाहविरोधी (अँटी इन्फ्लेमेंटरी) गुणधर्म शरीरातील दाह कमी करण्यास मदत करू शकतात.

# थोडक्यात

## ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, ऐरोली (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत भास्कर शनिवार कोटकर, दिपक शनिवार कोटकर व सुरेश शनिवार कोटकर यांनी घर क्र –१७०५/०१/०२/०३, देशमुखवाडी, से-०१, ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. तसेच दंडात्मक रक्कम एकूण ५०,०००/- रु वसूल करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी गॅस कटर, ब्रेकर, मजूर व मुकादम यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली, सहाय्यक आयुक्त डॉ.अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे व इतर अधिकारी / कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलिस पथक उपस्थित होते.

## सुपा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैध्य धंदे बंद करा - सामाजिक कार्यकर्ते कुलथे



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अ.नगर) :** सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अवैध्यरीत्या चालू असलेले सुपा नवीन म्हसणे फाटा च.ख.उ तसेच नगर पुणे हायवे वरती हॉटेल जयराज आणि हॉटेल राखी पलेस (सौंदर्या इन) जातेगाव फाटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावरती देह विक्री (वेश्या व्यवसाय) चालतो. तसेच हायवे लगत असणार्या हॉटेल वरती अवैध्य मार्गाने रात्रीच्या वेळेस येणाऱ्या गाड्यांमधून सळई, अनेक प्रकारचे लोखंड व भंगार हे खरेदी केले जाते. तसेच हायवे लगत असणारे धाबे, हॉटेल व टपरया यांसवरती दारू विक्री, गुटखा विक्री, गांजा विक्री असे व्यवसाय चालतात. तसेच म्हसणे फाटा येथील नवीन च.ख.उ व सुपा येथील जुनी च.ख.उ यामध्ये ही मोठ्या प्रमाणात टपरयावरती व हॉटेल वरती मोठ्या प्रमाणात दारू, गांजा व गुटखा विक्री केला जातो. सुपा परिसरात चोरट्या पद्धतीने मटका व इतर अवैध्य व्यवसाय चालू असून तसेच म्हसणे फाटा, सुपा नवीन च.ख.उ व जुनी च.ख.उ व वाघुंडे यामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध्यारित्या सिलेंडर मधून ५ किलोच्या छोट्या टाकीमध्ये अनाधिकृतपणे रहदारीच्या ठिकाणी गॅस भरून दिला जात आहे. तरी अश्या अवैध्यरित्या चालणाऱ्या धंद्यावरती आपल्या कार्यालयाकडून कार्यवाही झाल्याचे दिसून येत नसून आपल्या कार्यालयाचा व आपला धाक नसून हे धंदे मोकाट स्थिती मध्ये दिसून येत आहे. तरी आपण लक्ष देऊन त्या अवैध्यरित्या चालविणाऱ्या व्यवसाय धारकांवरती आपणाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असे भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश महा राज्य या संस्थेचे जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## पेनटाकळी धरणाच्या पाण्यात उतरून महिलांचे बेमुदत उपोषण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, बुलडाणा :** धरणग्रस्त पेनटाकळी गावाचे स्थलांतरण नियमानुसार व्हावे आणि ३८० प्लॉटचे वितरण करण्यात यावे या मागणीकडे शासकीय यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने गावातील महिलांनी रौद्र रूप धारण केले! त्यांनी पेन टाकळी धरणाच्या पाण्यात उतरून बेमुदत उपोषण सुरु केले. मेहकर तालुक्यातील पेनटाकळी गावातील रहिवासीयांनी दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी बुलडाणा यांना निवेदन दिले होते. पेन टाकळी येथील गावठाणचे स्थलांतर योग्य पद्धतीने करण्याकरिता ७ दिवसांच्या अवधी देण्यात आला होता. मात्र जिल्हा प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याने अखेरीस आजपासून गावकर्यांनी पेनटाकळी जलाशयात बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे.

मौजे पेनटाकळी येथे तब्बल ३८० घरांचे स्थलांतर करणे क्रम प्राप्त आहे. मात्र हे करताना यंत्रणा मनमानी करीत आहे. यामुळे जिल्हाधिकारी वा मेहकर एसडीओ यांनी स्थलांतराची कार्यवाही करावी अशी उपोषण कर्त्यांची मागणी आहे. भूमी अभिलेख आणि नगर रचना विभागाच्या कारवाईनंतर दोनशे एकोनपन्नास प्लॉट काढण्यात आले. मात्र तीनशे ऐंशी प्लॉट आवश्यक असल्याने गावकर्यांनी स्थलंतर ला विरोध केला आहे. सुमन लहाने, शांता मते, भागु अंभोरे, मंगला इंगळे, शोभा मगर, जयश्री राऊत, संगीता मोरे, द्वारका वाघ, कुसुम मगर,मंदा इंगळे,मंदा वाघ, द्रौपदी काकडे, सुनंदा निकम, कौशल्या धंदरे, मयुरा गायकवाड, सरस्वती इंगळे, मणकर्णा इंगळे,केशर इंगळे, शांता इंगळे,अनुराधा डुकरे,शितल इंगळे, दुर्गा अंभोरे, दीक्षा वानखेडे,अलका गवई, सुशीला वानखेडे, लता वानखेडे,ज्योती वानखेडे,रमा वानखेडे, उषा गवई, मीना वानखेडे, वैशाली वानखेडे,रत्नमाला वानखेडे,नर्मदा वानखेडे, गुंफा वानखेडे, अन्नपूर्णा वानखेडे,सीमा वानखेडे,शीला खरात, निर्मला गायकवाड, कांता कांबळे,मीरा राजेकर,मनीषा काकडे, लक्ष्मी काकडे,गीता काकडे इत्यादी महिलानि आंदोलनास्त्र उगारले! त्यांच्या समवेत मधुकर खरात, शत्रुघ्न वानखेडे, मधुकर इंगळे,दीपक काकडे,भगवान वानखेडे, रामदास वानखेडे,संजय वानखेडे,बाळू वानखेडे, गजानन वानखेडे,प्रकाश कांबळे,जगदीश इंगळे, परसराम इंगळे,गजानन वाघ,आनंद वानखेडे, दत्तात्रय इंगळे,दगडू गवई, संतोष खरात,अमोल डुकरे,सदाशिव काकडे, दत्तात्रय धोंडगे,सुरेश इंगळे,पुरुषोत्तम माळेकर, शिवाजी वानखेडे, पुंजाजी इंगळे,शंकर इंगळे,मंगेश इंगळे, विश्वास इंगळे,किसन मोरे,भागवत जाधव, गजानन इंगळे,त्र्यंबक इंगळे,सर्जेराव इंगळे, गुलाब इंगळे,संतोष डुकरे,भीमराव वानखेडे, भीमराव काकडे,अक्षय इंगळे, संजय अंभोरे,रवींद्र इंगळे,धोंडीराम ठोंबरे, वैभव इंगळे,गोपाल इंगळे,पंजाब इंगळे,पुंडलिक खरात,परमेश्वर वानखेडे, प्रवीण इंगळे,शिवप्रसाद जाधव,केशव इंगळे, पंढरी इंगळे, मधुकर धोंडगे, तेजराव राजेकर, अशोक सुरवसे,जयराम केवट, नारायण जाधव, महादू वानखेडे,विजय मते,विकास गायकवाड, किसन इंगळे हे देखील आंदोलनात सहभागी झाले आहे.